## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२१ (          ) वर्ग खोलीत मिळणारे शिक्षण औपचारिक असते तर वर्ग खोली बाहेर अनौपचारिक शिक्षण मिळत असते. रासेयोच्या शिबीरातून मिळणाऱ्या अनौपचारिक शिक्षणातून देशाची विविधता, एकता, बंधुत्व अनुभवायला मिळते ज्याचा उपयोग व्यक्तिमत्व विकासासाठी होतो असे प्रतिपादन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी केले.

भारत सरकारचे युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय आणि रासेयोचे विभागीय संचालनालय पुणे व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात दि.१२ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिर झाले. या शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रा.माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, रासेयो प्रादेशिक संचालक डॉ.अजय शिंदे, युथ ऑफीसर सुमंतकुमार यादव, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते.

महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगना, गुजरात, दमन, दादरा-नगरहवेली, गोवा या सात राज्यातील १०० रा.से.यो. विद्यार्थी व १०० रा.से.यो. विद्यार्थिनी असे एकूण २०० रासेयो स्वंयसेवक या १० दिवसीय शिबिरात सहभागी झाले होते. गुरुवार दि.२१ रोजी या शिबीराचा समारोप मोठया उत्साहात झाला.  आपल्या भाषणात कुलगुरु प्रा.माहेश्वरी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्त ठेवणे गरजेचे आहे.  तसेच ज्ञान आणि क्षमता यांना आपले गुरु बनवावे, अभिमान आणि अहंकार यातील सीमारेषा समजून घ्यावी आणि वेळेचा सन्मान ठेवावा. ही चतु:सूत्री अंमलात आणली तर उत्तम नागरिक व्हाल अशी अपेक्षा व्यक्त करुन त्यांनी मोठी स्वप्न बाळगण्याचे आवाहन केले.  रासेयोच्या या शिबीरातून संघभावना, नेतृत्व, समन्वय, आदर या गुणांची ओळख झाली असेल.  यातून तूमच्या पुढील वाटचालीसाठी उपयोग होईल असेही ते म्हणाले.

प्रमुख पाहुणे डॉ.अजय शिंदे यांनी माईंडसेट विकसित करण्यासाठी रासेयो शिबीराचा उपयोग होतो असे मत व्यक्त केले.  यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने मीतराजसिंग जाडेजा (गुजराथ), प्रियंका विश्वास (दमण), के. जगन (तेलंगाणा) आणि अमृता दारुंटे (महाराष्ट्र) यांनी मनोगत व्यक्त केले. तर संघ व्यवस्थापकांच्या वतीने प्रा.शैलेश (गुजराथ), डॉ.हरीसन कोटा (गोवा) आणि डॉ.भारती (आंध्र प्रदेश) यांनी शिबीराविषयी प्रतिक्रिया नोंदवली. प्रारंभी डॉ. सचिन नांद्रे यांनी शिबिराचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश पाटील यांनी केले. प्रा. विजय पाटील यांनी आभार मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. २१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने  ५ डिसेंबर रोजी जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तिन जिल्हयांसाठी होणाऱ्या जिल्हास्तरीय आणि ७ डिसेंबर रोजी विद्यापीठ प्रशाळांसाठी होणाऱ्या आविष्कार संशोधन स्पर्धेच्या नोंदणीसाठी २८ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आणि विविध परीक्षांच्या अनुषंगाने महाविद्यालयांचा अविष्कार समन्वयकांकडून नोंदणीची मुदत वाढवून देण्याची मुदत करण्यात आली होती. त्याअनुषंगाने आता २८ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.  ५ डिसेंबर रोजी तीन ठिकाणी अविष्कार संशोधन स्पर्धा होणार आहे. जळगाव जिल्ह्याची स्पर्धा महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब सुरेश पाटील महाविद्यालय, चोपडा, धुळे जिल्ह्याची स्पर्धा विद्या विकास मंडळाचे सि.गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे आणि नंदुरबार जिल्ह्याची स्पर्धा नंदुरबार तालुका विधायक समितीचे जी.टी. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार येथे होणार आहे. तर विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा विद्यापीठात ७ डिसेंबर रोजी होईल. पहिल्या टप्प्यातील या स्पर्धा झाल्यानंतर विद्यापीठ पातळीवरील अविष्कार संशोधन स्पर्धा १९ व २० डिसेंबर रोजी विद्यापीठात होईल. अशी माहिती विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

.......................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४                                    दिनांक: २१ नोव्हेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी